पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली

दि. 15/08/2017

# पोलीस शौर्य पदक प्राप्त जवानांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

## ( पोलीस अधिक्षक कार्यालयासह जिल्हाभरात ध्वजारोहण उत्साहात साजरे )

---000---

पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे सकाळी-7.30 वा. मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित अधिकारी व जवानांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. गडचिरोली पोलीस दलातील ज्या 191 पोलीस अधिकारी व जवानांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्यांच्या स्मृतीस नमन करुन मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यानीं उपस्थितीतांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रसंगी पोलीस शौर्य पदक प्राप्त अधिकरी, जवान तसेच शहीद दोघे आत्राम व स्वरुप अमृतकर यांच्या कुटुबियांचा सन्मान व सत्कार मा.पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांचे हस्ते करण्यात आला. पदक प्राप्त अधिकारी व जवानांनकडुन प्रेरणाघेवुन शौर्यपुर्ण कामगीरी करण्याचे आवाहन करण्यात आले.

जिल्हाधीकारी कार्यालयाच्या प्रागंणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम गडचिरोलीचे पालकमंत्री मा. श्री. राजे अंम्ब्रीशराव अत्राम (राज्यमंत्री आदिवासी विकास) यांच्या हस्ते पार पडला. पोलीस दलात शौर्यपुर्ण कामगीरी करणारे पोलीस पदक प्राप्त अधिकारी व जवानांना पालकमंत्र्याच्या हस्ते गौरवण्यात आले.

संपुर्ण जिल्हाभरातील पोस्टे, उपपोस्टे, पोलीस मदत केंद्र येथे ध्वजारोहनाचा कार्यक्रम उत्साह साजरा करण्यात आला असुन प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम व प्रतिज्ञाचे वाचन अतिदुर्गम भागातील गांवकरी तसेच विदयार्थ्यांकडुन करण्यात आले.

मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी पदक प्राप्त अधिकारी व जवानांचे कौतुक करुन आपल्या प्राणांची पर्वा न करता देशसेवेसाठी लढणा-या जवानांना तसेच उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देवून अभिनंदन केले.

